(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयात**
**दिवाणी अपील अधिकारिता**

**2023 ची रिट याचिका क्र. 15949**

नीलेश सुरेश केने आणि इतर …… याचिकाकर्ता
(मूळ प्रतिवादी क्र. 1 ते 4)

**विरूद्ध**

अशोक दुर्गा पिल्ले आणि इतर. …… उत्तरवादी

……………….

- याचिकाकर्त्यांकरिता श्री. विजय किल्लेदार, अधिवक्ता.
- उत्तरवादी क्र. 1 आणि 2 ए ते 2 सी करिता श्री. ज्ञानेश्वर देशमुख.
- उत्तरवादी क्रमांक 7 ते 13 चे पॉवर ऑफ अटॉर्नी होल्डर, उत्तरवादी क्रमांक 5 आणि 6 करिता मेसर्स एन. दीपक अँड कंपनी यांचेकडून निर्देश घेऊन श्री. दीपक सी. नाटू यांचेसह सुश्री गायत्री के. सोनी.
- न्यायमित्र श्री. अक्षय पै.

……………….

**कोरम : न्यायमूर्ति मिलिंद एन. जाधव.**

**दिनांक : जानेवारी 02, 2025**

**न्या य नि र्ण य**

1. पक्षकारांची बाजू मांडणारे विद्वान वकील यांना ऐकले.

2. मूळ प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 असलेल्या याचिकाकर्त्यांद्वारे रिट याचिका दाखल केली गेली आहे, ज्यात जिल्हा न्यायाधीश-2, कल्याण यांनी 2021 चा व्यावसायिक दावा क्र. 02 मध्ये निशाणी '72' आणि '88 ए' च्या खाली पारित केलेल्या आक्षेपित सामाईक आदेश, दि. 13.01.2023 ला आव्हान दिले आहे. सोयीसाठी पक्षकारांना 'वादी' आणि 'प्रतिवादी' म्हणून संबोधले जाते.

3. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी निशाणी '63' च्या खाली दाखल केलेल्या प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्र दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यासाठी वादींनी निशाणी '72' च्या खाली अर्ज दाखल केला आहे.

4. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी निशाणी '63' च्या खाली दाखल केलेल्या प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्र दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांनी निशाणी '88 ए' च्या खाली अर्ज दाखल केला आहे.

5. प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 हे वादींचे समर्थन करत आहेत. प्रतिवाद करणारे प्रतिवादी हे प्रतिवादी क्र. 1 ते 4 आहेत.

6. आक्षेपित आदेश दि. 13.01.2013 द्वारे, प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्र दाखल करण्यास झालेला विलंब खर्चाच्या आदेशासह क्षमापित केला गेला. हा एक व्यावसायिक दावा असल्याने, 120 दिवसांच्या विहित कालावधीच्या नंतरचा विलंब क्षमापित करण्यास मंजुरी देणाऱ्या या आदेशाला प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी आव्हान दिले आहे.

7. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 असा दावा करतात की प्रतिहक्कमागणीला वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांचे प्रतिवादपत्रे त्यांच्यावर प्रतिहक्कमागणीच्या बजावणीच्या 30 दिवसांच्या आत किंवा त्यानंतर जास्तीत जास्त 90 दिवसांच्या आत न्यायालयाच्या अनुमतीने दाखल केले गेले पाहिजे होते.

8. वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 या दोघांनीही त्यांच्यावर प्रतिहक्कमागणीच्या बजावणीच्या तारखेपासून अनुक्रमे 142 आणि 155 दिवसांनंतर त्यांचे प्रतिवादपत्रे दाखल केले आहे. हा विलंब न्यायालयाने क्षमापित केला आहे. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 व्यथित आहेत आणि म्हणूनच हे आव्हान आहे.

9. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 नुसार, दाव्याची कार्यवाही हि व्यावसायिक दावा असल्याने, व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 अंतर्गत विहित केलेल्या 120

दिवसांचा सक्त मुदतीचा कालावधी म्हणजेच 30 दिवसांचा आणि 90 दिवसांची वाढीव सवलतीची मुदत, वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांना त्यांनी दाखल केलेल्या प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्रे दाखल करण्यासाठी लागू होईल. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी सादर केले की 120 दिवसांच्या उक्त कालावधीच्या नंतरचा विलंब क्षमापित करणे कायद्याने अनुज्ञेय नाही.

10. आदेश दि. 26.06.2024 च्यानुसार, मी, वरील मुद्द्यावर न्यायालयाला मदत करण्यासाठी आणि 120 दिवसांच्या कालावधीनंतरचा, व्यावसायिक दाव्याच्या कार्यवाहीत प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रे दाखल करण्यास होणारा विलंब क्षमापित करण्याच्या न्यायालयाच्या अधिकाराच्या प्रश्नावर निर्णय देण्यासाठी, श्री. अक्षय पै यांची *न्यायमित्र* म्हणून नियुक्ती केली. विद्वान वकिलांनी केलेल्या सबमिशनचा मी उल्लेख करण्यापूर्वी, खालील तथ्ये विचार करण्यासाठी संबंधित आहेतः

10.1 उत्तरवादी क्रमांक 1 आणि 2-वादींनी अनुक्रमे 3600 चौरस मीटर आणि 950 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या सर्वे/हिसा क्रमांक 52/11/1 आणि 52/2 असलेल्या मालमत्तांच्या संदर्भात घोषणा आणि नुकसानी साठी 2021 चा व्यावसायिक दावा क्रमांक 02 दाखल केला. 20, 418 चौरस फूट असलेल्या सूट मालमत्तेवर बांधण्यात आलेल्या 'ए' विंग इमारतीत 45 टक्के हिस्सा म्हणजेच शिल्लक कार्पेट क्षेत्रासाठी हक्क

मिळावा आणि याचिकाकर्ते-प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांच्याकडून 24 टक्के व्याजासह रु. 3,66,85,000/- एवढ्या रकमेची नुकसानी/नुकसानभरपाई मिळावी यासाठी दावा दाखल करण्यात आला आहे.

10.2 प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 व्यावसायिक दाव्यात हजर झाले आणि त्यांनी निशाणी "63" च्या खाली दि. 31.03.2022 ला प्रतिहक्कमागणीसह त्यांचे प्रतिवादपत्रं दाखल केले. त्यांनी त्यांच्या प्रतिहक्कमागणीत प्रार्थना केली की वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे त्यांना ताब्यासह 5361.70 चौरस फूट इतके अतिरिक्त क्षेत्र परत करण्यास जबाबदार आहेत.

10.3 प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी दि. 31.03.2022 ला त्यांच्या प्रतिवादपत्रासह निशाणी "63" खाली प्रतिहक्कमागणी दाखल केली आहे. वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांचेवर प्रतिहक्कमागणीची बजावणी अनुक्रमे दि. 20.04.2022 आणि 10.06.2022 ला केली गेली. वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांनी त्यांच्यावर प्रतिहक्कमागणीच्या बजावणीच्या तारखेपासून 120 दिवसांच्या आत प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्र दाखल केले नाही.

10.4 दरम्यान, वादी क्रमांक 2 चे दि. 09.05.2022 ला निधन झाले आणि त्याच्या कायदेशीर वारसांना दि. 12.08.2022 ला अभिलेखावर आणले गेले. दि. 20.08.2022 ला, 22 दिवसांचा विलंब क्षमापित करण्यासाठी वादींद्वारे निशाणी 72 च्या खाली अर्ज दाखल केला गेला.

10.5 व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 अंतर्गत व्यावसायिक विवादांना लागू असलेल्या दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 (थोडक्यात "**सी. पी. सी**".) च्या आदेश VIII नियम 6 जी, नियम 6 ए, नियम 1 आणि नियम 10 अंतर्गत प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी या अर्जाला विरोध केला आहे.

10.6 प्रतिवादी क्र. 5 ते 13 यांनी देखील निशाणी '88 ए' च्या खाली अर्ज दाखल करून प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 च्या प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्र दाखल करण्यात झालेला 35 दिवसांचा विलंब क्षमापित करण्याची मागणी केली.

10.7 या अर्जाला देखील प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 6 जी, नियम 6 ए, नियम 1 आणि नियम 10 अंतर्गत विरोध केला आहे.

10.8 विद्वान जिल्हा न्यायाधीश-2, कल्याण यांनी पारित केलेल्या सामाईक आदेशाद्वारे, वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांच्यावर रु. 10,000/- खर्च लादून

प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी झालेला 22 दिवस आणि 35 दिवसांचा विलंब क्षमापित करून, निशाणी 72 आणि 88 ए च्या खाली असलेल्या दोन्ही अर्जांना मंजूर केले.

11. याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील श्री. किल्लेदार यांनी सादर केले की, प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही असा निर्णय देण्यात विद्वान न्यायाधीश यांनी चूक केली आणि प्रतिवादपत्रं दाखल करण्यात 120 दिवसांच्या सांविधिक कालावधीच्या नंतरचा विलंब होण्याचे पुरेसे कारण दर्शविले गेले आहे असे निरीक्षण नोंदवून विलंब क्षमापित केला.

11.1 त्यांनी सादर केले की सी. पी. सी. आणि व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 अंतर्गत प्रतिवादींनी वादपत्राला प्रतिवादपत्रं दाखल करण्याशी संबंधित नियम सी. पी. सी. च्या नियम 10 सह वाचन केलेल्या आदेश VIII नियम 6 जी, नियम 6 ए, नियम 1 अंतर्गत प्रतिहक्कमागणीस प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी परी मटेरियामध्ये समजण्यात यावे आणि लागू केले जावे. त्यांनी सादर केले की प्रतिहक्कमागणी हि एकतर प्रतिवादपत्रासह दाखल केलेल्या किंवा त्यात समाविष्ट असलेल्या वादपत्राच्या स्वरूपाव्यतिरिक्त आणखी काही नाही. त्यांनी सादर केले की विलंब क्षमापित करण्यास

मंजुरी दिल्यास सी. पी. सी. च्या आदेश VIII च्या नियम 10 सह वाचलेल्या नियम 1 आणि नियम 6 जी ची तरतूद पूर्णपणे प्रतिकूल ठरेल.

11.2 त्यांनी वरील सांविधिक तरतुदींकडे माझे लक्ष वेधले आहे.

11.3 त्यांनी गळ घातली कि व्यावसायिक दाव्याच्या कार्यवाहीला कठोर निर्वचन नियम लागू होतो आणि त्यामुळे 120 दिवसांपेक्षा जास्त विलंब क्षमापित करणे अस्वीकार्य आहे. त्यामुळे, त्यांच्या मते, आक्षेपित आदेश रद्द होण्यास पात्र आहे.

12. श्री. देशमुख, वादींसाठी हजर झाले. न्यायचौकशी न्यायालयासमोर, ते वादी क्रमांक 1 आणि 2 आहेत. त्यांनी सादर केले की वादी क्रमांक 2 दि. 09.05.2022 ला मरण पावले. न्यायचौकशी न्यायालयाने वादी यांना दि. 12.08.2022 ला कायदेशीर वारस अभिलेखावर आणण्याची परवानगी दिली. त्यानंतर, वादी यांनी प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांचेवर निशाणी '72' खालील अर्जाच्या प्रतीसह सुधारित दाव्याच्या वादपत्राची प्रत (नव्याने कार्यवाहीत सामील करून घेतलेल्या वादी क्रमांक 2 ए ते 2 सी सह) बजाविली. निशाणी "72" खालील अर्जात 22 दिवसांच्या विलंबाला क्षमापित करण्याची आणि प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 चा प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी न्यायचौकशी न्यायालयाला अनुमती देण्याची मागणी करण्यात आली

होती. त्यामुळे, त्यांच्या मते, विलंब क्षमापित करण्यासाठी आणि प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्याची अनुमती मागण्यासाठी केलेला निशाणी 72 खालील अर्जाच्या प्रतीच्या बजावणीच्या तारखेपासून, मुदतीचा कालावधी सुरू होईल.

12.1 त्यांनी सादर केले कि सी. पी. सी. च्या आदेश VII नियम 11 (एफ) सह वाचन केलेल्या आदेश VII नियम 9 अंतर्गत विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करणे अनिवार्य आहे, तसे न केल्यास वादपत्रं/प्रतिहक्कमागणी नाकारण्यास पात्र आहे. त्यांनी सादर केले की आदेश VII नियम 9 अंतर्गत वादपत्रं म्हणून प्रतिहक्कमागणी स्वीकृत केल्यावर, न्यायालयाला सी. पी. सी. च्या आदेश V नियम 9 च्या आदेशाचे पालन करावे लागेल. या प्रकरणात, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी त्यांचा प्रतिहक्कमागणी दाखल केल्यानंतर वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांना समन्स जारी केले नाहीत. त्यांनी सादर केले कि पक्षकार म्हणजे वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 हे अंधेरी-मुंबई, कॅनडा आणि यु.ए.इ. येथील रहिवासी आहेत आणि त्यापैकी काही कल्याण येथील व्यावसायिक न्यायालयाच्या क्षेत्रात राहत नाहीत, जिथे दावा दाखल केला गेला आणि म्हणूनच, सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 6 ए (3) अंतर्गत विहित प्रक्रियेचे पालन करणे प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 वर बंधनकारक आहे.

12.2 वर नमूद केलेल्या प्रक्रियेच्या संदर्भात, त्यांनी सादर केले की, मान्य केल्याप्रमाणे, याचिकाकर्त्यांनी त्याचे पालन केले नाही आणि म्हणूनच, सी. पी. सी. च्या आदेश VII नियम 11 (एफ) च्या तरतुदींनुसार वादपत्रं नाकारले जाण्यास पात्र आहे. त्यांनी सादर केले की की उत्तरवादी क्रमांक 1 आणि 2 ए ते 2 सी-वादींनी निशाणी 72 खालील त्यांच्या अर्जामध्ये परिच्छेद क्रमांक 2 मध्ये विशेषतः कैफियत मांडली आहे की सी. पी. सी. च्या आदेश XI नियम 14 अंतर्गत त्यांचा अर्ज न्यायचौकशी न्यायालयासमोर त्यांनी त्यांच्या प्रतिवादपत्रात संदर्भित संबंधित कागदपत्रे सादर करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 ला निर्देश मागण्यासाठी प्रलंबित आहे आणि त्याचे आजपर्यंत पालन केले गेले नाही. त्यामुळे मुदत धावणे सुरू होऊ शकले नसते आणि वादपत्राला किंवा प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्याच्या पक्षकाराच्या अधिकारावर अंकुश ठेवण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा विचार केला पाहिजे.

12.3 त्यांनी सादर केले की, सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 1 आणि आदेश VIII नियम 6 ए (3) च्या तरतुदी प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी लागू होत नाहीत. सी. पी. सी. च्या आदेश V नियम 9 सह वाचलेल्या आदेश VII नियम 9 च्या अनिवार्य तरतुदींचे पालन केल्यानंतरच मुदत धावणेस सुरुवात होते. त्यांनी सादर केले की, खरं तर, उलटपक्षी, सध्याच्या प्रकरणात, सी. पी. सी. च्या आदेश VII नियम

11 (एफ) चे पालन न केल्याबद्दल प्रतिहक्कमागणी नाकारली गेली पाहिजे. त्यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 त्यांच्या स्वतःच्या चुकीच्या/पालन न करण्याचा अनुचित फायदा घेऊ शकत नाहीत आणि मुदत प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 च्या अनुपालना नंतरच सुरू होईल.

12.4 (1) ***शालिनी नुनेस मस्करेन्हास .विरुद्ध. ट्रेवर नुनेस***[1] (2) ***दत्ताराम म्रिष्णनाथ पेडणेकर .विरुद्ध. पांडुरंग के. पेडणेकर***[2] (3) ***मेसर्स सी. एस. सी. ओ. एल. एल. सी. (उपरोल्लेखित)*** हे नैसर्गिक न्यायाची कार्यपद्धती आणि तत्त्वे कायम ठेवणारे प्रकरणे आहेत, असा युक्तिवाद करत ते त्यांच्या सबमिशनच्या समर्थनार्थ वरील निर्णयांचा संदर्भ देतात आणि त्यांच्यावर अवलंबून आहेत. ते असे सादर करून शेवट करतात की, सी. पी. सी. च्या आदेश VII नियम 11 (एफ) सह वाचलेल्या नियम 9 अंतर्गत दाखल केलेल्या वादपत्राप्रमाणेच प्रतिहक्कमागणीची बजावणी अंमलात आणली गेली नाही आणि बजावणी केली गेली नाही, त्यामुळे सध्याच्या तथ्यांमध्ये मुदत कालावधी म्हणजे 120 दिवस धावणेस सुरुवात झाली आहे असे म्हणता येणार नाही.

---

1 2009 (1) गोवा एलआर 457

2 2010 (7) एम एच एल जे 386

13. प्रतिवादी क्र. 5 ते 13 चे विद्वान वकील श्री. नाटु यांनी सादर केले की, जोपर्यंत निशाणी 63 चा संबंध आहे, तो त्यांच्याशी संबंधित नाहीत, कारण त्यांनी निशाणी 88 ए खाली अर्ज दाखल केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की त्यांना प्रतिहक्कमागणीची प्रत केवळ दि. 10.06.2022 ला मिळाली होती आणि विकास करार आणि पुरवणी करारातील लवाद खंड लक्षात घेता, विवाद लवादाकडे पाठवण्याचा अर्ज नाकारण्यात आला होता. त्यांनी सादर केले कि त्यानंतरच, सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 1 अंतर्गत विचार केल्याप्रमाणे 120 दिवसांच्या आत त्यांचे प्रतिवादपत्र दाखल करणे आवश्यक होते. ते माझे लक्ष व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 याचे सह वाचन करत सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 1 कडे वळविले, जो खाली उद्धृत केला आहे :

> *“(i) नियम 1 मध्ये, परंतुकासाठी, खालील परंतुक प्रतिस्थापित केला जाईल, म्हणजे -*
>
> *"परंतु, प्रतिवादी उक्त तीस दिवसांच्या कालावधीत प्रतिवादपत्र दाखल करण्यात अयशस्वी झाल्यास, त्याला लेखी नोंदविलेल्या कारणांसाठी आणि न्यायालयाला योग्य वाटेल अशा खर्चाच्या देण्यावर, न्यायालयाने निर्दिष्ट केलेल्या अशा दुसऱ्या दिवशी प्रतिवादपत्रं दाखल करण्याची परवानगी दिली जाईल, परंतु जे समन्स बजावण्याच्या तारखेपासून एकशे वीस दिवसांपेक्षा जास्त नसावे आणि समन्स बजावण्याच्या तारखेपासून एकशे वीस दिवसांची मुदत संपल्यानंतर, प्रतिवादीला प्रतिवादपत्रं दाखल करण्याचा अधिकार गमवावा लागेल आणि न्यायालय प्रतिवादपत्र अभिलेखावर घेण्यास परवानगी देणार नाही”,”*

13.1 त्यांनी सादर केले कि वरीलनुसार, प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्र दाखल करण्याची कालमर्यादा समन्स प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 120 दिवसांची आहे आणि केवळ त्याची मुदत संपल्यावर, प्रतिवादी प्रतिवादपत्र दाखल करण्याचा त्याचा अधिकार गमावतो. त्यांनी असा युक्तिवाद केला की प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 चे आरोप निराधार आहेत कारण ते व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 च्या अनुसूची I सह वाचन केलेल्या सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 6 ए (1) ते (4) च्या तरतुदींचे पालन करण्यात अयशस्वी ठरले आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी केलेला युक्तिवाद कि आक्षेपित आदेश टिकून राहण्यायोग्य नाही हा कायद्याच्या निश्चित स्थितीशी पूर्णपणे विसंगत आहे.

13.2 पुढे त्यांनी सादर केले की निशाणी 'जी' म्हणजे आक्षेपित आदेश वैध आणि योग्य कारणे नोंदवतो, खरे तर, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 हे व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 च्या अनुसूची I च्या आदेश V नियम 10, 11, 12, 12 ए, 13 (1) आणि (2) सह वाचन केलेल्या कलम 9-ए (1) ते (4) अंतर्गत समन्स जारी करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात अयशस्वी ठरले. हे मान्य आहे की, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांना समन्स जारी करण्यासाठी आणि समन्स बजावण्यासाठी कोणतीही पावले उचलली नाहीत. त्यांनी सादर केले की संविधीत स्पष्टपणे तरतूद आहे की

प्रतिहक्कमागणी हि वादपत्रं म्हणून मानले जाईल आणि वादपत्राला लागू असलेल्या नियमांद्वारे शासित केली जाईल. परिणामी, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांना त्यांच्या प्रतिहक्कमागणीच्या बजावणीची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 वर समन्स बजावणे आवश्यक होते. त्याचे पालन न केल्यामुळे प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्र दाखल करण्यास विलंब झाला. त्यामुळे, न्यायचौकशी न्यायालयाने आदेश VIII नियम 1 आणि व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 च्या सुधारित अनुसूची I अंतर्गत दिलेल्या आदेशाचे पालन केले नाही, असा प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांचा युक्तिवाद पूर्णपणे क्षुल्लक आहे. त्यांनी सादर केले की सांविधिक प्रक्रियेचे पालन करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 च्या बाजूने स्पष्ट अपालन आहे आणि ते त्यांना सोडून देऊ शकत नाहीत.

13.3 त्यांनी प्रतिहक्कमागणीकडे माझे लक्ष वेधले आणि सादर केले की व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 च्या आदेश VIII नियम 10 मध्ये 120 दिवसांच्या कालावधीत प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी मुदत निश्चित केली आहे, परंतु वादी आणि प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 द्वारे त्यांची प्रतिहक्कमागणी दाखल केल्यानंतर प्रतिवादीला क्र. 5 ते 13 यांचेवर समन्स बजावण्याच्या प्रक्रियेचे पालन करावे लागेल.

13.4 ***मेसर्स सी. एस. सी. ओ. एल. एल. सी. आणि अन्य .विरुद्ध. मेसर्स लक्ष्मी सरस्वती स्पिंटेक्स लिमिटेड आणि इतर***[3] या प्रकरणातील मद्रास उच्च न्यायालयाच्या **एकल न्यायमूर्तिच्या** न्यायनिर्णयाकडे त्यांनी माझे लक्ष वेधले, ज्यामध्ये न्यायालयाने असे म्हटले आहे की व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 च्या अनुसूची I च्या सुधारित आदेश VIII नियम 1 मध्ये 120 दिवसांचा मुदत कालावधी आहे, परंतु त्यात सी. पी. सी. च्या इतर पद्धतींचे अनुसरण करणे आवश्यक आहे. त्या विशिष्ट प्रकरणात, सांविधिक प्रक्रियेचे पालन न केल्यामुळे प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं 120 दिवसांच्या पलीकडे योग्यरित्या अभिलेखावर घेतले गेले. त्यांच्या मते, परिच्छेद क्रमांक 3 ते 27 मध्ये नमूद केलेले या न्यायनिर्णयाची तथ्ये आणि गुणोत्तर सध्याच्या प्रकरणातील तथ्यांना पूर्णपणे लागू होतात.

13.5 पुढे, त्यांनी ***प्रकाश कॉर्पोरेट्स .विरुद्ध. डी वी प्रोजेक्ट्स लिमिटेड***[4] या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाकडे माझे लक्ष वेधले, ज्यामध्ये मुख्य प्रश्न ज्यावर निर्णय देण्यात आला तो असा होता की विषयातील दाव्यात प्रतिवादपत्रं दाखल करण्याची संधी योग्यरित्या नाकारली गेली होती किंवा कसे किंवा कोविड-19 महामारीच्या पार्श्वभूमीवर पारित आणि जारी केलेल्या आदेशांच्या पार्श्वभूमीवर ती

---

3 सी. एस. क्र. 697/2017 मधील अर्ज क्र. 4791/2021

4 (2022) 5 एस. सी. सी 112

आणखी वाढवता येऊ शकते किंवा कसे. छत्तीसगडच्या उच्च न्यायालयाने कोविड-19 महामारीच्या दुसऱ्या लाटेमुळे उद्भवलेल्या धोक्याच्या परिस्थितीची दखल घेतली आणि उच्च न्यायालयाने उच्च न्यायालय आणि अधीनस्थ न्यायालयांचे कामकाज कमी करण्यासाठी प्रशासकीय आदेश, दि. 05.04.2021 जारी केला आणि आणखी की या विषयावरील दावा हाताळणारे न्यायचौकशी न्यायालय आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजनांखाली होते आणि ते सामान्यपणे काम करू शकले नसते, असे निरीक्षण नोंदवून सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले. 2020 च्या एस. एम. डब्ल्यू. पी. क्रमांक 3 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता, त्यात असे म्हटले आहे की प्रकाश कॉर्पोरेट्सने विषयातील दाव्यात प्रतिवादपत्रं दाखल करण्याची कालमर्यादा 06.05.2021 वर संपलेली नाही आणि पक्षाला मुदतीच्या विहित कालावधीच्या नंतर प्रतिवादपत्र दाखल करण्याची परवानगी दिली. त्यामुळे, विलंब क्षमापित करण्याचा आक्षेपित आदेश कायम करण्यात येणे योग्य आहे, असे त्यांनी सादर केले.

14. श्री. पै, विद्वान *न्यायमित्र*, यांनी त्यांच्या सबमिशनच्या समर्थनार्थ उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाच्या खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ दिला आणि त्यांच्यावर अवलंबून राहले. ***शालिनी नुनेस मस्करेन्हास (उपरोल्लेखित), दत्ताराम म्रिष्णनाथ***

***पेडणेकर (उपरोल्लेखित)*** या व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 लागू होण्यापूर्वीच्या दोन्ही न्यायनिर्णयांच्या प्रकरणात, असे म्हटले आहे की प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्र दाखल करण्याचा कालावधी सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 1 च्या तरतुदींद्वारे नियंत्रित केला जात नाही, तथापि, तो आदेश VIII नियम 6 ए (3) अंतर्गत विहित केलेल्या कालावधीनुसार आहे आणि जोपर्यंत न्यायालय प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी स्पष्टपणे वेळ देत नाही. ***एस. सी. जी. काँट्रॅक्ट्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड .विरुद्ध. के. एस. चमनकर इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आणि इतर***[5] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की वादपत्राला प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी समन्स बजावल्यापासून 120 दिवसांचा कालावधी अनिवार्य आहे आणि असे करण्यात अयशस्वी झाल्यास, चूक करणारा पक्ष प्रतिवादपत्र दाखल करण्याचा त्याचा अधिकार गमावेल. या न्यायनिर्णयाचे अनुसरण आमच्या न्यायालयाने ***मीरा गेहानी .विरुद्ध. ॲक्सिस बँक***[6] या प्रकरणात केले आहे ज्यात असे म्हटले आहे की, व्यावसायिक न्यायालयाला 120 दिवसांच्या अनिवार्य कालावधी नंतर प्रतिवादपत्रं दाखल करण्यास होणारा विलंब क्षमापित करण्याची अधिकारिता नाही आणि व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 लागू करण्याचा हेतू प्रतिवादपत्रं

---

5 (2019) 12 एस. सी. सी. 210

6 2019 एस. सी. सी. ऑनलाईन बॉम्ब 358

दाखल करण्यास होणारा विलंब रोखणे आणि जलद सुनावणी सुनिश्चित करणे हा होता. ***पी. एस. ए. नायट्रोजन लिमिटेड .विरुद्ध. मड्दा कॉर्पोरेशन आणि इतर***[7] आणि ***इंडकॉन बॉयलर लिमिटेड .विरुद्ध. मड्दा कॉर्पोरेशन आणि इतर***[8] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी 120 दिवसांचा अनिवार्य कालावधी प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी देखील लागू होईल आणि समन्स बजावण्याच्या तारखेपासून तो सुरू होईल. न्यायालयाने असेही म्हटले की, त्या प्रकरणात वादीला प्रतिहक्कमागणीचे समन्स योग्य प्रकारे बजावले गेले नसल्यामुळे, विहित 120 दिवसांचा मुदत कालावधी सुरू झाला नव्हता. न्यायालयाने त्यामध्ये मार्गदर्शक तत्त्वे तयार केली ज्यामुळे सी. पी. सी. च्या **आदेश IV** नुसार सर्व प्रतिहक्कमागणीची नोंदणी करणे अनिवार्य झाले आहे. तथापि, सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 6 ए (4) च्या तरतुदींचा विचार करता, न्यायालयाने असे म्हटले की एकदा प्रतिहक्कमागणीची बजावणी स्वीकारली गेली आणि आदेशात नोंदवली गेली की, 120 दिवसांचा मुदत कालावधी त्या तारखेपासून सुरू होईल.

14.1 त्यांनी सादर केले की ***मेसर्स सी. एस. सी. ओ. एल. एल. सी.*** (***उपरोल्लेखित***) च्या प्रकरणातील निर्णय ज्यामध्ये न्यायालयाने असे म्हटले आहे की प्रतिवादपत्र दाखल

---

7 2019 एस. सी. सी. ऑनलाइन डेल 10095

8 2019 एस. सी. सी. ऑनलाइन डेल 10096

करण्यासाठी 120 दिवसांचा अनिवार्य कालावधी प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी लागू होणार नाही, तो मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ***मारिया अल्बर्ट स्टॅनली .विरुद्ध. डायमंड हॉस्पिटल इक्विपमेंट्स***[9] या प्रकरणात फेटाळला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी देखील 120 दिवसांचा अनिवार्य कालावधी लागू आहे. खंडपीठाने मार्गदर्शक तत्त्वे तयार केली ज्यामुळे प्रतिहक्कमागणीला नोंदवणे आणि उक्त 120 दिवसांचा अनिवार्य कालावधी प्रारंभासाठी पक्षांना समन्स बजावणे अनिवार्य केले गेले.

14.2 वरील सायटेशन्स यांचे आधारे, त्यांनी सादर केले की उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने घेतलेले मत की वादपत्राला प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी 120 दिवसांचा अनिवार्य कालावधी प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी देखील लागू होईल. त्यांनी सादर केले की इतर कोणत्याही दृष्टिकोनामुळे व्यावसायिक न्यायालय अधिनियम, 2015 च्या सांविधिक तरतुदी पूर्णपणे निरर्थक ठरतील कारण त्या प्रकरणात, एकाच कार्यवाहीत प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी दोन भिन्न कालावधी असतील, एक वादपत्रासाठी आणि दुसरा प्रतिहक्कमागणीसाठी.

---

9 2022 चा सी. एस. (कॉम. डिव.) क्रमांक 14

14.3 त्यांनी सादर केले की सी. पी. सी. च्या आदेश III नियम 5 मध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की योग्यरित्या नियुक्त केलेल्या वकीलाला बजावणी केलेली कोणतीही आदेशिका पक्षाला योग्य प्रकारे कळवली जाईल असे गृहित धरले जाईल. या तरतुदीला सर्वोच्च न्यायालयाने ***नीलकंठ सिद्रमप्पा निंगशेट्टी .विरुद्ध. काशीनाथ सोमन्ना निंगशेट्टी आणि इतर***[10] आणि ***दामोदरन पिल्लई आणि इतर .विरुद्ध. साऊथ इंडियन बँक लिमिटेड***[11] या प्रकरणांमध्ये दुजोरा दिला आहे. आणखी ***वूमेन्स इंडियन असोसिएशन (रजि.) .विरुद्ध. व्ही. मंगुडी***[12] या प्रकरणात असे म्हटले आहे की सी. पी. सी. अंतर्गत प्रतिहक्कमागणीचे समन्स बजावण्यासाठी कोणतीही विशिष्ट तरतूद नसल्यामुळे, आदेश III नियम 5 च्या तरतुदी लक्षात घेऊन वादीच्या वकिलावर प्रतिहक्कमागणीची बजावणी ही वादीवर चांगली बजावणी आहे.

14.4 त्यांनी असे सादर केले कि सी. पी. सी. च्या आदेश VIII नियम 6 ए सह वाचन केलेल्या कलम 141 च्या तरतुदींचा विचार करून आणि उपरोक्त न्यायनिर्णयांमधील निर्णयाचा विचार करता, कायद्यानुसार विरोधी पक्षाला प्रतिहक्कमागणीची प्रत रीतसर बजावली गेली नाही आणि/किंवा कळवली गेली नाही तर 120 दिवसांचा कालावधी

---

10 ए. आय. आर. 1962 एससी 666

11 ( 2005 ) 7 एससीसी 300

12 1993 ( 15 ) मॅड एल. जे. 483

प्रारंभासाठी सी. पी. सी. च्या आदेश V नुसार विरोधी पक्षाला प्रतिहक्कमागणीच्या संदर्भात स्वतंत्र सूट समन्स बजावणे अनिवार्य असेल का, असा प्रश्न उपस्थित होईल. त्यांनी सादर केले कि सध्याच्या प्रकरणात हा प्रश्न उद्भवणार नाही, कारण प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 च्या प्रतिहक्कमागणीची बजावणी वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांनी त्यांच्या वकिलांद्वारे रीतसर स्वीकारली आणि अभिस्वीकृत केली होती. तथापि, न्यायचौकशी न्यायालयाने ***मेसर्स सी. एस. सी. ओ. एल. एल. सी. (उपरोल्लेखित)*** च्या प्रकरणातील मद्रास उच्च न्यायालयाच्या एकल न्यायमूर्ति न्यायपीठाच्या निर्णयाच्या आधारे विलंब क्षमापित केला, त्यानंतर तो चुकीचा कायदा असल्याचे मानले गेले आणि ***मारिया अल्बर्ट स्टॅनली*** (नववी उपरोल्लेखित) च्या प्रकरणात खंडपीठाने तो रद्द केला, कारण त्यात असे म्हटले होते की प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्याचा कालावधी आदेश VIII नियम 1 द्वारे नियंत्रित केला जाणार नाही, परंतु आदेश VIII नियम 6 ए (3) द्वारे नियंत्रित केला जाईल.

14.5 त्यांनी सादर केले की, ***एस. सी. जी. काँट्रॅक्ट्स (उपरोल्लेखित)*** मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आणि ***मीरा गेहानी (उपरोल्लेखित)*** मध्ये आमच्या उच्च न्यायालयाने प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्यासाठी 120 दिवसांना अनिवार्य कालावधी म्हणून ठरवला आहे आणि अनिवार्य कालावधी नंतर प्रतिवादपत्रं दाखल करण्यास

होणारा विलंब क्षमापित करण्याचा व्यावसायिक न्यायालयाला कोणताही अधिकार नाही. त्यामुळे, त्यांनी सादर केले की हातातील प्रकरणात उक्त तत्त्वे लागू करून, प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं याला 120 दिवसांचा अनिवार्य कालावधी लागू होत नाही, असे मत नोंदवून विलंब क्षमापित करण्यात न्यायचौकशी न्यायालयाने चूक केली.

15. मी वरील सायटेशन्स यांचे अवलोकन केले आहे. सध्याच्या प्रकरणात, असे दिसून येते की प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी दि. 31.03.2022 ला निशाणी 63 खाली त्यांच्या प्रतिहक्कमागणीसह प्रतिवादपत्रं दाखल केले आहे. म्हणून, सध्याच्या प्रकरणातील तथ्यांमध्ये 120 दिवसांपेक्षा जास्त विलंब क्षमापित करण्याबाबतच्या प्रश्नावर निर्णय घेण्यापूर्वी, विचारार्थ काही तारखा नोंदवणे आवश्यक आहे. हे मान्य आहे की, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी त्यांचे प्रतिवादपत्रं, निशाणी 63 खालील त्यांच्या प्रतिहक्कमागणीसह, दि. 31.03.2022 ला न्यायालयात दाखल केले आहे.

16. असे दिसून आले आहे की त्या तारखेला, वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 वर प्रतिवादपत्रं/प्रतिहक्कमागणीची बजावणी अंमलात आणण्यात आली नव्हती. असे दिसून येते की प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी त्यांच्या प्रतिवादपत्राच्या आणि प्रतिहक्कमागणीच्या प्रतीची बजावणी वादींवर/वादीच्या प्लीडरवर दि. 20.04.2022 ला केली. त्यानंतर ती प्रतिवादींना/प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 च्या प्लीडरला दि.

10.06.2022 ला बजावण्यात आली. जोपर्यंत वादींचा संबंध आहे, वादी क्रमांक 2 चे दि. 09.05.2022 ला निधन झाले आणि त्यानंतर, वादींनी त्याच्या कायदेशीर वारसांना अभिलेखावर आणण्याच्या दृष्टीने पावले उचलली, ज्याला न्यायालयाने दि. 12.08.2022 वर परवानगी दिली होती.

17. अशा प्रकारे, जोपर्यंत वादींचा संबंध आहे, जरी अन्यथा दि. 20.04.2022 ला त्यांचेवर प्रतिहक्कमागणीची बजावणी केली गेली असली तरी, त्यानंतरची घटना घडली. उपरोक्त तारखा लक्षात घेऊन असे दिसून येते की प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी न्यायालयात दि. 31.03.2022 ला प्रतिहक्कमागणी दाखल केली असली तरी, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी स्वतः वादीला ती बजाविण्यासाठी 20 दिवस घेतले आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांना ती बजाविण्यासाठी 71 दिवस घेतले. या संदर्भात, आदेश VIII, नियम 6 जी पाहणे आणि लागू करणे आवश्यक आहे. नियम 6 जी खालीलप्रमाणे आहेः

> *"**6 जी. प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम लागू असणे.** - प्रतिहक्कमागणीला उत्तर म्हणून दाखल केलेल्या प्रतिवादपत्राला, प्रतिवादींच्या प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम लागू होतील."*

18. वरील तरतुदीत स्पष्टपणे नमूद केले आहे की प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम प्रतिहक्कमागणीला उत्तर म्हणून दाखल केलेल्या प्रतिवादपत्रास लागू होतील. या प्रकरणात, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 द्वारे प्रतिहक्कमागणी दाखल केली आहे. जरी प्रत

फिर्यादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांना बजाविली गेली असली, तरी जर नियम 6 जी लागू होत असताना तो लागू करावा लागला तर प्रतिवादींनी दाखल केलेल्या प्रतिवादपत्राशी संबंधित नियमांनुसार नियंत्रित होत असल्याने वादींना प्रतिहक्कमागणीला त्यांचे प्रतिवादपत्र दाखल करणे आवश्यक आहे. न्यायालयासमोर प्रश्न असा आहे की नियम 6 जी द्वारे योजिल्या प्रमाणे प्रतिवादपत्राशी संबंधित नियम सध्याच्या प्रकरणात लागू केले गेले आहेत की अन्यथा. सध्याच्या प्रकरणात निर्णय घेण्याजोगा हा एक छोटा मुद्दा आहे.

19. विद्वान वकिलांनी आणि *न्यायमित्र* यांनी केलेल्या सबमिशनची नोंद करताना कायदेशीर स्थिती येथे वर नमूद केली आहे. या संदर्भात, आदेश VIII, नियम 6 ए (3) च्या तरतुदी सुसंगत आहेत. या नियमात असे म्हटले आहे की न्यायालयाने निश्चित केलेल्या कालावधीत वादीला प्रतिवादीच्या प्रतिहक्कमागणीचे उत्तर म्हणून प्रतिवादपत्र दाखल करण्याचे स्वातंत्र्य असेल. आम्ही सध्याच्या प्रकरणात व्यावसायिक दाव्याशी संबंधित आहोत. त्यामुळे प्रतिवादपत्र दाखल करण्याच्या संदर्भात सक्त नियम कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे पालन करण्याच्या अधीन राहून विहित केल्यानुसार लागू होतील. त्यामुळे, या संदर्भात, आदेश VIII नियम 6 ए (1) (2) (3) (4) च्या तरतुदी प्रासंगिक आणि लागू झाल्या. नियम 6 ए च्या पोट - कलम (1) मध्ये अशी तरतूद आहे

की प्रतिवादी त्याच्या प्रतिवादपत्राव्यतिरिक्त वादीविरुद्ध प्रतिहक्कमागणीच्या माध्यमातून त्याचा दावा मांडू शकतो. पोट-कलम (2) मध्ये अशी तरतूद आहे की, प्रतिहक्कमागणीचा परिणाम क्रॉस-सूट सारखाच असेल, जेणेकरून न्यायालय मूळ हक्कमागणी आणि प्रतिहक्कमागणी या दोन्हीवर एकाच दाव्यात अंतिम न्यायनिर्णय देण्यास सक्षम होईल. "क्रॉस-सूट" हे शब्द महत्त्वपूर्ण आहेत, कारण ते सूचित करते की प्रतिहक्कमागणीचा अर्थ दाव्याच्या कार्यवाहीसारखाच असेल. नियम 6 ए  च्या पोट कलम (4) मध्ये असे म्हटले आहे की प्रतिहक्कमागणीस वादपत्र (*भर दिल्या जातो*) म्हणून मानल्या जाईल आणि वादपत्रांना लागू असलेल्या नियमांद्वारे नियंत्रित केल्या जाईल. वरील तरतुदी न्यायालयासमोरील प्रश्नाचे स्पष्टपणे उत्तर देतात. एकदा विधिमंडळाचा हेतू असा झाला की प्रतिहक्कमागणीस वादपत्रं म्हणून मानले जाईल आणि वादपत्राला लागू असलेल्या नियमांद्वारे नियंत्रित केले जाईल, तर वादपत्राशी संबंधित सर्व नियम प्रतिहक्कमागणीस लागू होतील (जणू ते वादपत्र आहे). याचा स्पष्ट अर्थ असा होईल की जेव्हा प्रतिहक्कमागणी दाखल केल्या जाते, तेव्हा ती दिवाणी न्यायालयात वादपत्रं दाखल करण्याच्या संबंधीचे आणि त्यानंतरच्या प्रक्रियेच्या सर्व नियमांचे पालन करेल. या संदर्भात तो दिवाणी दावा आहे की व्यावसायिक दावा यात कोणताही फरक करता येणार नाही.

20. सध्याच्या प्रकरणात, एकदा दि. 31.03.2022 ला प्रतिहक्कमागणी दाखल झाल्यानंतर, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांना वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांच्यावर उपरोक्त प्रतिहक्कमागणीची बजावणी, दाव्याच्या कार्यवाहीच्या प्रकरणात केल्या जाणाऱ्या उपरोक्त नमूद केलेल्या तरतुदींनुसार काटेकोरपणे अंमलात आणावी लागेल. याचा अर्थ असा आहे की प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 ला वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 वर प्रतिहक्कमागणीच्या प्रतीसह प्रतिहक्कमागणीच्या समन्सचा रिट बजावणी करण्यासाठी पावले उचलावी लागतील. सध्याच्या प्रकरणातील प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 यांनी मान्य केल्यानुसार वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांचेवर प्रतिहक्कमागणीच्या समन्सचे रिटची बजावणी केली नाही. त्यांनी केवळ वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 किंवा त्यांच्या प्लीडरला त्यांच्या प्रतिवादपत्राच्या आणि प्रतिहक्कमागणीच्या प्रतीची बजावणी केली आहे. केवळ वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 यांचेवर किंवा त्यांचे प्लीडरवर प्रतिहक्कमागणीच्या प्रतीची बजावणी करणे ही चांगली बजावणी ठरेल, हा मुद्द्यावर माझ्यासमोर युक्तिवाद करण्यात आला. प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 साठीचे विद्वान वकील श्री. किल्लेदार यांनी जोरदार युक्तिवाद केला आहे की वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 वरील प्रतिहक्कमागणीची बजावणी सी. पी. सी. ने योजिल्या प्रमाणे प्रतिहक्कमागणीच्या समन्सच्या रिटच्या बजावणीच्या समतुल्य

आहे आणि कोणत्याही स्वतंत्र समन्सच्या रिटची बजावणी करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी सादर केले कि एकदा प्रतिहक्कमागणीची प्रत विरूद्ध पक्षाला बजाविल्या गेली की ती चांगली बजावणी मानली जाते आणि त्यासह विरूद्ध पक्षाच्या निदर्शनास आणून दिले जाते आणि प्रतिहक्कमागणीला प्रतिवादपत्रं दाखल करण्याचा मुदत कालावधी त्या तारखेपासून सुरू होतो. तथापि, उपरोक्त सांविधिक तरतुदींमधील विधिमंडळाचा हेतू स्पष्टपणे स्पष्ट आहे या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर श्री. किल्लेदार यांनी केलेल्या सबमिशनशी मी सहमत नाही. जर मला श्री. किल्लेदार यांनी मांडलेला प्रस्ताव स्वीकारावा लागला तर ते एक विदारक परिस्थितीला कारणीभूत ठरेल. त्याच दाव्यात, दाव्याच्या वादपत्राकरिता वादींद्वारे प्रतिवादींना समन्सचा रिट बजावण्यासाठी प्रक्रियेचा एक संच असेल, परंतु त्याच दाव्यात, प्रतिवादीकडून प्रतिहक्कमागणीसाठी वादींवर रिट समन्स बजावण्याच्या संदर्भात तीच सांविधिक प्रक्रिया अनावश्यक केली जाईल. हे विधिमंडळाचे उद्दिष्ट असू शकत नाही, जेव्हा ते स्पष्टपणे असे नमूद करते की प्रतिहक्कमागणी वादपत्र म्हणून समजल्या जाईल आणि सी. पी. सी. च्या आदेश VIII च्या नियम 6ए च्या पोट कलम (4) मधील वादपत्रांना लागू असलेल्या नियमांद्वारे नियंत्रित केली जाईल.

21. सध्याच्या प्रकरणातील माझी वरील निरीक्षणे आणि निष्कर्ष लक्षात घेता, प्रतिवादी क्रमांक 1 ते 4 द्वारे वादी आणि प्रतिवादी क्रमांक 5 ते 13 वर समन्सच्या रिट ची बजावणी मान्य केल्यानुसार केली गेली नसल्यामुळे, माझे स्पष्ट मत आहे की मुदतीचा कालावधी सुरू झालेला नाही. या प्रकरणाच्या त्या दृष्टिकोनातून, आक्षेपित आदेश अविरत राखण्यास पात्र आहे. मी, अभिलेखावर विद्वान *न्यायमित्र* यांनी सादर केलेल्या दिल्ली आणि मद्रास उच्च न्यायालयांच्या ***पी. एस. ए. नायट्रोजन लिमिटेड .विरुद्ध. मइदा कॉर्पोरेशन आणि इतर***[13], ***इंडकॉन बॉयलर लिमिटेड विरुद्ध मइदा कॉर्पोरेशन आणि इतर***[14] आणि ***मारिया अल्बर्ट स्टॅनली विरुद्ध डायमंड हॉस्पिटल इक्विपमेंट्स***[15] या प्रकरणांमध्ये नोंदवलेल्या निर्णयांचा संदर्भ घेऊ इच्छितो. त्या निर्णयांमध्ये, संबंधित उच्च न्यायालयांनी प्रतिहक्कमागणीची नोंदणी करणे आणि पक्षांना समन्स बजावणे अनिवार्य करून मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत जेणेकरून खात्री होईल की प्रतिवादपत्रे दाखल करण्यासाठी मुदतीचा अनिवार्य कालावधी सुरू झाला आहे. वरील बाबी लक्षात घेता, असा युक्तिवाद केला जाऊ शकत नाही आणि म्हणूनच, सी. पी. सी. अंतर्गत प्रतिहक्कमागणीच्या संदर्भात समन्स बजावण्यासाठी कोणतीही विशिष्ट तरतूद नाही आणि येथे वर चर्चा केलेल्या सी. पी. सी. च्या तरतुदींच्या दृष्टीने वादींवर

13 2019 एस. सी. सी. ऑनलाइन बॉम 358

14 2019 एस. सी. सी. ऑनलाईन डेल 10096

15 2022 चा सी. एस. (कॉम. डिव.) क्रमांक 14

प्रतिहक्कमागणीची बजावणी स्वतः ही चांगली बजावणी मानली जाईल. आदेश III नियम 5 हे आदेश VIII नियम 6 ए आणि अधिक विशेषतः त्याचा पोट-नियम (3) आणि पोट-नियम (4) याच्या निकटस्थितिने वाचले गेले तर, माझ्या मते, आदेश III नियम 5 च्या तरतुदी अधिभावी होऊ शकत नाहीत कारण नियम 6 ए च्या पोट-नियम (4) मध्ये स्पष्टपणे आदेश दिला आहे की प्रतिहक्कमागणीला वादपत्र म्हणून मानले जाईल आणि वादपत्राला लागू असलेल्या नियमांद्वारे नियंत्रित केली जाईल. आदेश VIII नियम 6 ए मधील प्रतिहक्कमागणीला लागू असलेली स्थायी तरतूद स्पष्टपणे सुव्यक्त आहे आणि म्हणूनच आदेश III, नियम 5 अंतर्गत प्रक्रियात्मक तरतूद आदेश VIII, नियम 6 ए अंतर्गत असलेल्या स्थायी तरतुदींवर मात करू शकत नाही आणि त्यांना मागे टाकू शकत नाही.

22. वरील बाबी लक्षात घेता, जिल्हा न्यायाधीश-2, कल्याण यांनी 2021 च्या व्यावसायिक दावा क्रमांक 02 मध्ये निशाणी '72' आणि '88 ए' खालील पारित केलेला आक्षेपित सामाईक आदेश, दि. 13.01.2023 योग्यरित्या पारित करण्यात आला आहे आणि त्यात सध्याच्या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितींमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आदेश कायम करण्यात येत आहे. परिणामी, रिट याचिका अयशस्वी होते.

23. न्यायालयाला कुशलतेने मदत करण्यासाठी आणि न्यायालयाला सध्याच्या याचिकेतील मुद्द्याचा निर्णय घेण्यास सक्षम करण्यासाठी उपलब्ध असलेल्या या विषयावरील सर्व संबंधित सायटेशन्स अभिलेखावर सादर करण्यासाठी न्यायालयाने नियुक्त केलेले विद्वान *न्यायमित्र* श्री अक्षय पै यांचे मी कौतुक नोंदवू इच्छितो.

24. रिट याचिका खारीज केली जाते.

[**न्यायमूर्ति मिलिंद एन. जाधव**]

25. न्यायनिर्णय अधिघोषीत केल्यानंतर, श्री. किल्लेदार याचिकाकर्त्यांना सर्वोच्च न्यायालयात जाण्यास सक्षम करण्यासाठी आठ आठवड्यांच्या कालावधीसाठी अंतरिमकालीन अनुतोष चालू ठेवण्यासाठी न्यायालयाला पटवून देतात. त्याची विनंती मान्य केली जाते. यापूर्वी देण्यात आलेला अंतरिमकालीन अनुतोष आजपासून आठ आठवड्यांच्या कालावधीसाठी आणखी चालू राहील.

[**न्यायमूर्ति मिलिंद एन. जाधव**]

**अस्वीकरण**

**"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."**